# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-21.05.2026** **वार- गुरुवार**

---

**खरीप हंगाम**

यंदाच्या खरीप हंगामावर एल-निनोचं सावट असणार आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार यावर्षी राज्यात सरासरीच्या केवळ 88 टक्के पाऊस पडण्याची शक्यता असून, याचा सर्वाधिक फटका पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या काही भागांना बसेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत दिली. राज्यस्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. एल निनोच्या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी राज्य सरकार सज्ज असल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं. हे संकट लक्षात घेता, जलयुक्त शिवार अभियानाची सर्व कामं जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. खरीप हंगामासाठी राज्यात आवश्यकतेपेक्षा जास्त बियाणे उपलब्ध आहे. प्रमाणित बियाणांसाठी शेतकऱ्यांनी 'साथी' पोर्टलवरील बियाणेच विकत घ्यावीत, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

**सिबील स्कोअर**

शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी कोणत्याही प्रकारच्या 'सिबील स्कोअर'ची मागणी केली जाऊ नये आणि सिबिलकरता शेतकऱ्यांची अडवणूक करू नये, अशी सक्त ताकीद राज्य सरकारनं राष्ट्रीयकृत बँकांना दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत दिली. राज्यस्तरीय बँकिंग कमिटीच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या बैठकीत पीक कर्ज वाटपाचा आढावा घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

**सामाजिक आढावा**

पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या आदेशानुसार समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांचा आणि सामाजिक प्रश्नांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी बैठकीत विविध विभागांकडून सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला आणि संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

**राजीव गांधी**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज पुण्यात त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. यानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दहशतवाद आणि हिंसाचार विरोधी दिन पाळण्यात आला. कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. पराग काळकर, यांच्यासह अधिकारी कर्मचाऱ्यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपस्थितांनी यावेळी दहशतवाद आणि हिंसाचार विरोधी प्रतिज्ञा घेतली.

**प्रशिक्षण**

केंद्रीय गृह विभाग आणि राज्य गृह विभागाच्या मार्गदर्शनाखाली नागरी संरक्षण दलाच्या उपनियंत्रक कार्यालयाच्या वतीनं पुण्यात प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या अंतर्गत नागरी संरक्षण दलानं 360

स्वयंसेवकांना नुकतंच 'क्षमता बांधणी आणि विकास प्रशिक्षण' दिलं. पोलीस उपायुक्त ऋषिकेश रावले यांच्या उपस्थितीत या स्वयंसेवकांना प्रशस्तीपत्र देण्यात आलं. युद्धजन्य परिस्थितीत सैन्य दलं देशाच्या सीमांवर कर्तव्य बजावत असताना, नागरी संरक्षण दलाची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते, या अनुषंगानं, संभाव्य आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत आणि जनजागृती कशी करावी, समन्वय कसा साधावा, याचं प्रशिक्षण स्वयंसेवकांना देण्यात आलं. अशी माहिती नागरी संरक्षण दलाचे सहायक उपनियंत्रक अर्जन खराडे यांनी दिली.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

पिंपरी चिंचवडला देशातील पहिलं 'एलपीजी विरहित शहर' बनवण्यासाठी गृहनिर्माण संस्था, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड आणि नागरिकांनी संयुक्तपणे पुढाकार घ्यावा असं आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केलं. या संदर्भातील एका बैठकीत ते आज बोलत होते. पिंपरी चिंचवड शहराला पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि आधुनिक इंधन व्यवस्थेकडे नेण्याचा महानगरपालिकेचा निर्धार आहे. शहरात एलपीजी गॅस सिलिंडरचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करून घरगुती पाईप गॅसचा वापर वाढविणे ही काळाची गरज असल्याचं आयुक्तांनी सांगितलं.

**<u>स्वच्छ शहर</u>**

पिंपरी चिंचवड शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि देशातील आदर्श शहर म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी नागरिकांच्या सक्रिय सहभागाची गरज असल्याचे मत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी व्यक्त केले. स्वच्छ सर्वेक्षण 2025-26अंतर्गत नागरिकांकडून मिळणारा अभिप्राय हा शहराच्या स्वच्छता व्यवस्थेच्या मूल्यमापनासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेत अभिप्राय नोंदवून शहराला देशात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

**<u>एव्हरेस्ट</u>**

पुण्यातील गिरिप्रेमी संस्थेच्या सदस्यांनी आणखी एकदा माऊंट एव्हरेस्टवर चढाई पूर्ण केली असून या सर्वोच्च शिखरावर आज सकाळी तिरंगा फडकवला. विवेक शिवडे, मिहिर जाधव, अखिल काटकर या गीरीप्रेमीच्या सदस्यांना उरजेन शेरपा, लकपा शेरपा आणि लकपा शेरपा यांनी सहकार्य केलं. गिरिप्रेमीच्या सदस्यांनी आता पर्यंत चार वेळा एव्हरेस्ट शिखर यशस्वीपणे सर केलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 अंश तर किमान तापमान 24 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेला. उद्या कमाल तापमानात आणखी थोडी घट अपेक्षित आहे. दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचाही अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**